# अखेर प्रिती बंड यांची बंडाळी

बडनेरा मतदासंघात देणार अपक्ष लढत | शिवसेनेची अर्धी मशाल विझली | उद्या दाखल करणार उमेदवारी



**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.26 )-** उबाठा शिवसेनेकडून उमेदवारी नाकारल्याने अखेर शिवसेनेचे दिवंगत माजी आमदार संजय बंड यांच्या पत्नी प्रिती बंड यांनी बंडाळी चे शस्त्र उपसले आहे. बडनेरा मतदारसंघातूनच त्या अपक्ष लढत देणार असून त्यांच्या बंडखोरीने शिवसेनेची अर्धी मशाल विझल्याचे दिसत आहे. त्या सोमवारी(दि.29) ला सकाळी 11 वाजता आपला उमेदवारी अर्ज निवडणूक आयोगाला सादर करणार आहेत.

गेल्या दोन दिवसांपुर्वी बडनेरा मतदासंघाकरिता महाविकास आघाडीचे उमेदवार म्हणून उबाठा शिवसेनेने सुनिल खराटे यांना उमेदवारी घोषीत केली. आम्हाला निवडणूकीच्या तयारीत गुंतवून दुसऱ्याच व्यक्तीला उमेदवारी देणे हा आमच्यासोबत विश्वासघात झाल्याचे सांगत बंड समर्थकांनी पहिल्या दिवसापासूनच स्वतंत्र लढण्याकरिता रणशिंग फुंकले होते, मात्र प्रिती बंड यांनी उध्दव साहेबांशी बोलल्यानंतरच पुढील निर्णय घेवू असे आवाहन आपल्या समर्थकांना केले होते. परंतू मातोश्रीवर कुणीच त्यांचे फोन उचलत नसल्याने गेल्या तीन दिवसात अनेक बैठका त्यांच्या समर्थकांनी त्यांच्या निवासस्थानी घेतल्या, समर्थकांच्या भावनांचा आदर करित त्यांनी अखेर अपक्ष लढत देण्याचा निर्णय घेतला. शनिवारी सायंकाळी त्यांच्या निवासस्थानी एक छोटेखानी सभा पार पडली, यावेळी येथे बडनेरा येथील माजी आमदार ज्ञानेश्वर धाने पाटीलसह अनेक शिवसैनिक उपस्थित होते.

### सामुहीक राजीनामे देणार

यावेळी उपस्थित शिवसैनिकांनी आपल्यावर अन्याय झाल्याचे सांगत प्रिती बंड यांचा उमेदवारी अर्ज दाखल होताच, आपण शिवसेनेच्या आपआपल्या पदावरुन सामुहीक राजीनामे देणार असल्याचे उपस्थित शिवसैनिकांनी यावेळी घोषीत केले.

### उध्दव साहेबांच्या अपमानाचा बदला घ्यायचा आहे!

“माझ्या रक्तात शिवसेना आहे आणि राहील. मला बडनेऱ्याच्या विद्यमान आमदारांनी उध्दव साहेबांच्या केलेल्या अपमानाचा बदला घ्यायचा आहे, याकरिता आम्ही हे रणशिंग फुंकत आहे.

**प्रिती संजय बंड,**
**संभाव्य अपक्ष उमेदवार**

### शिवसेनेने उमेदवारी रद्द केलीच नाही!

“ज्याप्रमाणे शिवसेना प्रमुख उध्दव ठाकरे यांनी प्रिती बंड यांना शब्द दिला होता की, उमेदवारी त्यांनाच देण्यात येईल, आम्ही त्याच शब्दावर टीकून आहो, उध्दव ठाकरे यांनी प्रिती बंड यांची उमेदवारी रद्द केली, याची अधिकृत घोषणा केली नाही, त्यामूळे आम्ही शिवसेनेचा अपक्ष उमेदवार म्हणून लढत देवू.

**ज्ञानेश्वर धाने पाटील,**
**माजी आमदार बडनेरा मतदारसंघ.**

# काळेंना भाजपची उमेदवारी, मेळघाट चे ‘राजकुमार’ मात्र अधांतरी

### महाविकास आघाडीचे पत्ते अजूनही लपूनच





**महासागर प्रतिनिधी**
**धारणी,( दि.26 )-** ऐन लोकसभा निवडणूकीमध्ये नवनित राणांचा पदर पकडून भारतीय जनता पक्षात गेलेले मेळघाट विधानसभा मतदारसंघातील काँग्रेसच माजी आमदार केवलराम काळे यांना अखेर भाजपने उमेदवारी घोषीत केली आहे. त्यामूळे महायुतीकडून धनुष्यबाण आपल्या हातात मिळणार असल्याचे स्वप्न रंगवित असलेले विद्यमान आमदार राजकुमार पटेल अंधातरी दिसत आहेत.

लोकसभेमध्ये मेळघाटमधून भाजपला मिळालेली लीड बघता गेल्या महिन्यात राजकुमार पटेल यांनी महायुतीमधून उमेदवारी मिळण्याकरिता अयशस्वी प्रयत्न केला. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते 700 कोटींच्या विकासकामाच्या भूमिपूजन समारंभाचा कार्यक्रम रद्द झाल्यापासून आ.पटेल यांच्या उमेदवारीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले होते, रतन टाटा यांच्या निधनाचे फक्त कारणच होते, तत्पुर्वीच मुख्यमंर्त्यांचा दौरा रद्द होता, त्याच दिवशी मुख्यमंर्त्यांचा मराठवाड्यातील तीन जिल्ह्यात दौरा होता, ज्याची प्रशासनाकडून अधिकृत घोषणा करण्यात आली होती, परंतू धारणी येथील मुख्यमंर्त्यांच्या दौऱ्याबद्दल प्रशासनाकडून कुठलीच अधिकृत घोषणा करण्यात आली नव्हती. आ.पटेलांची उमेदवारी तळ्यात मळ्यात वाटत असल्याने मुख्यमंर्त्यांनी आपले हात काढून घेतल्याचे भासत होते.

विशेष म्हणजे अजुनही आ.राजकुमार पटेल यांचा शिवसेनेत प्रवेश झालेला नाही, त्यातच भाजपकडून केवलराम काळे यांच्या उमेदवारीची घोषणा आ.पटेलांना धक्का देणारी ठरली, अंधातरी असलेले आ.पटेल पुढे काय निर्णय घेतील हे पाहण्यासारखे ठरेल.

### डॉ. हेमंत चिमोटे यांना काँग्रेसची उमेदवारी

मेळघाटमध्ये महाविकास आघाडीच्या उमेदवारीवर सुरु असलेला पेच शनिवारी रात्री उशिरा मिटला. ऑल इंडीया काँग्रेस कमिटीने मेळघाट मतदारसंघात डॉ.हेमंत चिमोटे यांना काँग्रेसची उमेदवारी घोषीत केली आहे. त्यामूळे आता आ.पटेल हे पुन्हा अपक्ष लढणार असल्याचे चिन्ह दिसत आहे.

## महिलेला मारहाण

**वरुड-** पोटाची खडके भरण्यासाठी पानठेला चालवीत असलेल्या महिलेला अश्लील शिवीगाळ करून मारहाण केल्याप्रकरणी व पानठेल्यामधून सात हजार रुपये घेऊन प्रसार झालेल्या आरोपी विषयी फिर्यादी महिलेच्या तक्रारीवरून पोलिसांनी आरोपी विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

## देशी बनावटीच्या पिस्तुलसह एकाला अटक

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.26 )-** आणखी एका आरोपीकडून देशी बनावटीचे पिस्तूल जप्त करण्यात आले असून त्याला गुन्हे शाखा युनिट एक च्या पथकाने 26 ऑक्टोबर रोजी हाथीपुरा येथून अटक केली आहे. मोहम्मद मुद्दसीर मोहम्मद आसिफ (38, रा. हाथीपुरा चांदणी चौक अमरावती) असे आरोपीचे नाव आहे. गुन्हे शाखा युनिट एकने गेल्या दोन दिवसांत दोन आरोपींकडून पिस्तुले जप्त केली आहेत. पोलीस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी यांनी पोलीस आयुक्तालयातील रेकॉर्डवरील गुन्हेगार आणि परस्पर वादातून झालेल्या गुन्ह्यातील तक्रारदार व आरोपींची चौकशी करून गुन्हेगारांवर प्रतिबंधात्मक कारवाई करण्याचे आदेश दिले होते. त्या पार्श्वभूमीवर गुन्हे शाखा युनिट एकचे पोलीस अधिकारी व अंमलदार नागपूरीगेट पोलीस ठाण्याच्या हद्दीत आरोपींचा शोध घेत होते. यावेळी रेकॉर्डधारक आरोपी मुद्दसीर याच्याकडे पिस्तूल असल्याची गोपनीय माहिती मिळाली. माहितीच्या आधारे पोलिसांनी तात्काळ मुद्दसीरच्या घरी जाऊन त्याला ताब्यात घेतले. पिस्तुलाबाबत चौकशी केली असता, हे पिस्तूल जिशान नगर येथील डी.एड कॉलेजजवळ राहणाऱ्या त्याच्या सासूच्या बंद घरात ठेवल्याची माहिती दिली. पोलिसांचे पथक तात्काळ मुद्दसीरच्या सासूच्या घरी गेले आणि पलंगाखाली उशीत ठेवलेले पिस्तूल ताब्यात घेतले. जप्त केलेल्या पिस्तुलाची किंमत 25 हजार रुपये असल्याचे सांगण्यात येत आहे. आरोपी मुदसीरविरुद्ध पोलिस ठाण्यात तक्रार दाखल करण्याची प्रक्रिया सुरू झाली होती.

## महिलेच्या खात्यातून 6.51 लाख गायब

सायबर पोलिस ठाण्यात तक्रार

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,दि.26 ) -** विनापरवानगी महिलेच्या खात्यात पैसे जमा करून, महिलेच्या खात्यात जमा झालेली रक्कम काढून तिची फसवणूक करण्यात आली. याप्रकरणी महिलेने 25 ऑक्टोबर रोजी सायबर पोलिस ठाण्यात तक्रार केली आहे. ही घटना 30 सप्टेंबर 2024 ते 21 ऑक्टोबर 2024 दरम्यान घडली. महिलेच्या तक्रारीवरून सायबर पोलिसांनी तीन मोबाईल धारकांविरुध्द गुन्हा नोंदविला आहे.

30 सप्टेंबर 2024 रोजी शहरातील रहिवासी तक्रारदार महिलेच्या खात्यात 5 लाख 57 हजार रुपये विनापरवाना जमा करण्यात आले. यानंतर आणखी 38 हजार 700 रुपये क्रेडिट करण्यात आले. त्यानंतर पुन्हा महिलेची परवानगी न घेता, त्यांच्या खात्यातून 6 लाख 51 हजार 700 रुपयांचे ट्रान्जक्शन करण्यात आले. महिलेच्या खात्यात जमा झालेली 60 हजार 40 रुपयांची रक्कमही अज्ञात व्यक्तीने काढून घेऊन तिची फसवणूक केली. अज्ञात आरोपीने खात्यातून एकूण 6 लाख 51 हजार 700 रुपये विनापरवाना काढून फसवणूक केल्याचे महिलेने तक्रार म्हटले आहे.

## पुन्हा गोवंश तस्करी करणारे बोलेरो वाहन उलटले

11 गायी जप्त | रहाटगाव रिंगरोडवरील घटना

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.26 ) -** नांदगावपेठ पोलीस ठाण्याच्या हद्दीतील रहाटगाव रिंगरोड परिसरातून 11 गायींची तस्करी करणारे बोलेरो वाहन उलटले. पोलिसांना ही माहिती मिळताच त्यांनी तत्काळ घटनास्थळ गाठून सर्व गायींची सुटका करून त्यांना गोरक्षणासाठी सुरक्षित पाठवले. ही घटना 25 ऑक्टोबर रोजी घडली.

नांदगावपेठ पोलीस ठाण्याच्या हद्दीतील रहाटगाव रिंगरोड कल्पदीप मंगल कार्यालयाजवळ गायीने भरलेले बोलेरा पिकअप वाहन क्रमांक एमएच 06/बीजी 3854 उलटल्याची माहिती पोलिसांना मिळाली. पोलिसांचे पथक तात्काळ घटनास्थळी पोहोचले असता बोलेरो



पिकअप वाहन गायींनी भरलेले असल्याचे दिसले. पोलद्धस पथकाने तातडीने सर्व गुरे वाहनातून बाहेर काढली. वाहनात एकूण 11 गायी होत्या. पोलिसांनी सर्व गायींना गोरक्षणासाठी पाठवले आहे. जनावरे व जप्त केलेल्या वाहनाची किंमत 4 लाख 10 हजार रुपये असल्याचे सांगण्यात आले आहे. पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

## रामापूर शेतशिवार हातभट्टी दारुवर कारवाई

**महासागर प्रतिनिधी**
**मोर्शी,( दि.26 ) -** मध्यप्रदेशातून अवैध गावठी हातभट्टीची दारू हिवरखेड येथे विक्रीसाठी जात असतांना मोर्शी पोलिसांनी रामापुर शेत शिवारात धाड टाकून एकूण 62 हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात केला. विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अवैध गावठी हातभटटी दारू विकी करणार्याविरूध्द मोर्शी पोलिसांनी धडक मोहीम हाती घेतल्याने दारू विक्रेत्यांचे धाबे दणाणले आहे. मध्यप्रदेश व महाराष्ट्र राज्याच्या सीमेवर असलेल्या घनदाट जंगलात मोठ्या प्रमाणात अवैध गावठी दारू काढण्याचा गोरखधंदा कित्येक दिवसापासून सुरू आहे. ही गावठी हातभट्टीची दारू मोठ्या प्रमाणात महाराष्ट्रात विक्रीसाठी आणल्या जात असल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली होती. या माहितीवरून मोर्शीचे पोलीस निरीक्षक नितीन देशमुख त्यांच्या मार्गदर्शनाखाली 26 ऑक्टोंबर रोजी रामभाउ सुलाभराव धुर्वे (23, रा. जामगाव खडका) याला मध्यप्रदेशातील दारू दुचाकीने हिवरखेड आणताना रामापुर शेतशिवारात पकडण्यात आले. त्याच्या ताब्यातून एम.पी.05 एम एफ 8099 या क्रमांकाची दुचाकी व रबरी ट्युबमधील असा एकुन 62 हजाराचा मुद्देमाल जप्त करण्यात करण्यात आला. सदर आरोपीविरूध्द महाराष्ट्र दारूबंदी अधिनीयम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

# हाता तोंडाशी आलेला घास हिरावला

अवकाळी पावसाने सोयाबीन भिजले | कृषी विभागाला 17 हजार तक्रारी



*महासागर प्रतिनिधी*

***अमरावती, ( दि. 26 )-** परतीच्या पावसाने काढणीवर आलेल्या सोयाबीनचे मोठे नुकसान झाले. शिवाय फुटलेला कापूस भिजला व खराब झाला. हातातोंडाशी आलेला घास हिराविल्याने बाधित पिकांचे पंचनामे करून परतावा मिळावा, यासाठी पीक विमा कंपनीकडे 17,476 तक्रारी दाखल झाल्या आहेत. कंपनीद्वारा आतापर्यंत 11 हजार पूर्वसूचनांचे पंचना*मे करण्यात आलेले नाहीत. पीक कापणीपश्चात पावसाने नुकसान झाल्यास परतावा मिळण्याची तरतूद पीक विम्यामध्ये आहे. यासाठी पीक नुकसानीचे 72 तासांच्या आत संबंधित पीक विमा कंपनी किंवा कृषी विभागाकडे याची पूर्वसूचना द्यावी लागते. शुक्रवारी परतीच्या पावसाने सोंगणी व मळणी झालेल्या सोयाबीनचे मोठे नुकसान झाले.

शिवाय गंजी भिजल्या. या सोयाबीनला कोंब फुटण्याची शक्यता आहे मागच्या हंगामापासून फक्त एक रुपयात शेतकऱ्यांना सहभाग घेता येत असल्याने यावर्षी उच्चांकी म्हणजेच 5.10 लाख शेतकऱ्यांनी पीक विमा योजनेत सहभाग नोंदविला आहे.

यापूर्वी अतिवृष्टीने पिकांचे नुकसान झाले असल्याने एक लाखावर शेतकऱ्यांनी पीक विमा कंपनीकडे पूर्वसूचना दाखल केल्या आहेत. आता अतिवृष्टीने पुन्हा कापणीपश्चात नुकसान झाल्याने 17 हजारांवर शेतकऱ्यांनी कंपनीकडे परताव्यासाठी अर्ज केले आहेत.

### तालुकानिहाय तक्रारी

अचलपूर 888, अमरावती 1,309, अंजनगाव सुर्जी 1,776, भातकुली 1,025, चांदूर रेल्वे 1,151, चांदूरबाजार 977, चिखलदरा 71, दर्यापूर 1,033, धामणगाव रेल्वे 750, धारणी 229, मोर्शी 1,433, नांदगाव खंडेश्वर 6,291, तिवसा 337, वरुड 206 अशा एकूण 17,476 शेतकऱ्यांनी कंपनीकडे पूर्वसूचना पीकविमा कंपन्यांकडे दाखल केल्या आहेत.

# दर्यापूर मतदारसंघात शिवसेना विरुध्द शिवसेना

गजानन लेवटे यांना उबाठा सेनेची उमेदवारी



**महासागर प्रतिनिधी**
**अंजनगाव सुर्जी,( दि.26 )** - महायूतीमधून दर्यापूर विधानसभा मतदारसंघात शिंदे गटाच्या शिवसेनेकडून नुकतीच माजी आमदार अभिजीत अडसूळ यांनी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. त्यानंतर आता महाविकास आघाडीचे उमेदवार म्हणून उबाठा गटाच्या शिवसेनेकडून शनिवारी निष्ठावान शिवसैनिक गजानन लेवटे यांना उमेदवारी घोषीत झाल्याने दर्यापूर मतदारसंघात शिवसेना विरुध्द



शिवसेना अशी लढत होणार असल्याचे चित्र स्पष्ट झाले आहे.

गजानन लेवटे यांना उबाठा सेनेकडून उमेदवारी घोषीत होताच, अंजनगाव सुर्जी, दर्यापूर शहरातील शिवसैनिकांमध्ये प्रचंड उत्साह पहायला मिळाला. अंजनगावमूळे फटाख्याची आतषबाजी करुन आंनद साजरा करण्यात आला. गजानन लेवटे हे शिवसेनेचे माजी शहरप्रमुख व खरेदी विक्री संघाचे विद्यमान संचालक आहे. अनेक वर्षापासून ते शिवसेनेशी जुळलेले आहे. त्यामूळे दोन्ही शिवसेनेमध्ये निकराची लढत होणार असल्याचे स्पष्ट दिसत आहे.


आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# तिकीट वाटप : चातक पक्षी झाले उमेदवार!

## महाविकास, महायुतीच्या जागा वाटपावरील पेच सुटेना | भ्रमाचा भोपळा फुटण्याची स्थिती

**विलास पाटील**

**वरुड, ( दि.26 )–** मला अमक्या पक्षाची उमेदवारी मिळणारच असा भ्रमात असणाऱ्या उमेदवारांचा भ्रमाचा भोपळा फुटताना दिसत आहे. वरुड विधानसभा मतदारसंघातील महायूती व महाविकास आघाडीकडून अजूनही तिकीट वाटपाचे चित्र स्पष्ट नसल्याने उमेदवार चातक पक्ष्याप्रमाणे आपल्याला उमेदवारी मिळण्याची वाट पाहत आहे, दुसरीकडे महायुतीमध्ये अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसला सुटणारी जागा ही आता भाजपला सुटणार असल्याची चर्चा जोर पकडत असल्याने विद्यमान आमदारांच्या भ्रमाचा भोपळा फुटतो की, काय? असे वाटायला लागले आहे.



विधानसभा निवडणूकीचा नामांकन अर्ज दाखल करण्याला 22 ऑक्टोंबर पासून सुरूवात झाली, आतापर्यंत पाच दिवसात अनेकांनी अर्जाची उचल केली, अर्ज भरुन त्याला कागदोपत्री सजवून इच्छुक उमेदवार गुडघ्यात बांशिग अडकवून बसले आहेत, परंतू महाविकास आघाडी व महायुतीमधील पक्षाने आपले पत्ते उघडले नसल्याने उमेदवार बुचकळ्यात खात आहे. उमेदवारांना राजकीय पक्षांकडून 'वेट अँड वॉच' च्या स्थितीत ठेवले आहे, कुणाची उमेदवारी पक्की आणि कुणाची कच्ची हे सांगणे सध्या तरी कठीण झाले आहे. महायुतीच्या उमेदवारीबाबत मोर्शी–वरुड विधानसभा मतदार संघ हा भाजपला सुटणार असे बोलल्या जात आहे. त्यातही भाजपाचे चंदू उर्फ उमेश यावलकर यांनी जिल्हा उपाध्यक्ष पदाचा राजीनामा दिल्यानंतर त्यांचे नाव चर्चेत आले आहे. त्यांनाच उमेदवारी मिळणार असे मतदार संघात राजकीय पक्षाचे नेते कांगावा करीत आहे. याउलट महाविकास आघाडीची उमेदवारी ही काँग्रेसला सुटणार व काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष गिरीश कराळे यांना उमेदवारी मिळणार असा चर्चांना मतदार संघात उत आला आहे. दुसरीकडे इच्छुकही आपली दावेदारी करीत आहे. डॉ.मनोहर आंडे, विक्रम ठाकरे व महायुतीचे उमेदवार म्हणून भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष चंदू उर्फ उमेश यावलकर यांनी महाविकास आघाडीची उमेदवारी मिळावी म्हणून भारतीय जनता पार्टीचा जिल्हा उपाध्यक्ष पदाचा राजीनामा देऊन उमेदवारी मागितली होती, असे एक ना अनेक महाविकास आघाडीच्या उमेदवारीसाठी रांगेत उभे आहेत. पक्ष मात्र या सर्वांना पाय दुखेपर्यंत रांगेतच उभे ठेवत असल्याचे दिसून येत आहे.

### अपक्ष प्रचारात दोन वर्ग समोर

उमेदवारीकडे एकटक लक्ष लावून बसलेल्या उमेदवारांच्या तुलने अपक्षांनी आपला प्रचार ताकदीने सुरु केला आहे. महायुती व मविआच्या जागा वाटपाच्या गोंधळात अपक्ष उमेदवार प्रचारात दोन वर्ग पुढे निघून गेला आहे. संघातील मतदारांनी राजकीय पक्षाला धडा शिकविण्याचा चंग बांधला तर अपक्ष उमेदवार निवडून देण्याचा विचार मतदारांनी केला तर मोर्शी विधानसभा मतदारसंघातील चित्र बदलल्याशिवाय राहणार नाही.

# अंजनगाव बारीतील पशु वैद्यकीय दवाखाना डॉक्टरांविना

## जनावरांच्या आरोग्य तपासणीचा प्रश्न ऐरणीवर

**महासागर प्रतिनिधी**

**अंजनगाव बारी, ( दि.26 )–** पशुसंवर्धन खाते (महाराष्ट्र राज्य) स्थानिक वर्ग एक श्रेणीतील राज्यस्तरीय पशुवैद्यकीय दवाखाना गत 2 महिन्यांपासून डॉक्टर नसल्याने शोभेचा ठरत आहे. पशुपालकांना वैद्यकीय उपचार मिळत नसल्याने अनेक शेतकऱ्यांना आपली गुरे गमवावी लागत आहेत, प्रशासनाने याकडे लक्ष देत कारवाई करावी, अशी मागणी ग्रामस्थ व शेतकरी वर्गातून होत आहे. अंजनगाव बारी येथील पशुवैद्यकीय दवाखान्यातील स्थानिक महिला पशुवैद्यकीय अधिकारी प्रसुती रजेवर गेले असुन ते दीर्घ रजेवरुन कधी येतील? हा प्रश्न आहे. यामुळे जवळील परिसरातील पशुवैद्यकीय अधिकारी यांच्याकडे दवाखान्याचा कार्यभार सोपविण्यात यावा किंवा संबंधित प्रशासनाने याची दखल घेऊन नव्या डॉक्टरांची नेमणूक करण्यात यावी. पशुवैद्यकीय अधिकारी नसल्याने पशुपालकांना उपचाराकरिता गुरे कुठे न्यावी, असा प्रश्न पडत गुरांच्या आजारासंबंधी व उपचारासाठी शेतकऱ्याना खाजगी डॉक्टरकडे जावे लागत आहे. महागड्या उपचार परवडत नसल्याने शेतकरी आर्थिक कचाट्यात सापडला आहे. येथे 24 तास सेवा देणाऱ्या वैद्यकीय अधिकाऱ्याची गरज आहे. पशुसंवर्धन विभागाने याकडे लक्ष देत पूर्णवेळ डॉक्टरची नियुक्ती करावी, अशी मागणी गावकऱ्यांकडे केली जात आहे. जवळपास 30 वर्षं जुन्या असलेल्या या दवाखाना स्थानिक पशुवैद्यकीय अधिकारी रजेवर जात असुन पर्यायी डॉक्टरांची व सहाय्यक कंपाउंडरची नियुक्ती न करताच दवाखाना असा वाऱ्यावर सोडून देऊन जाणे ही एक खेदाची बाब असल्याचे गावकऱ्यांचे मत आहे.



> "गेल्या दोन महिन्यांपासून दवाखान्याला पशुवैद्यकीय अधिकारी नसल्याने आम्हाला खासगी डॉक्टर बोलवून उपचार करावा लागतो. यामुळे शासकीय वैद्यकीय सेवेचा लाभ मिळत नसुन पर्यायी आर्थिक लूटीला सामोर जावे लागत आहे.
>
> **सुनिल लोखंडे, पशुपालक, अंजनगाव बारी.**

# ओपिनियन आणि एक्झिट पोलला प्रतिबंध

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती –** भारत निवडणूक आयोगामार्फत महाराष्ट्र राज्य विधानसभा सार्वत्रिक निवडणूक 2024 साठीचा कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर आयोगाने निवडणूक कालावधीत निवडणूक निकालांचे अंदाज (ओपिनियन पोल तसेच एक्झिट पोल) दर्शविण्यावर प्रतिबंध केला आहे.




भारत निवडणूक आयोगाने विधानसभा सार्वत्रिक निवडणूक 2024 च्या अनुषंगाने 15 ऑक्टोबर 2024 पासून आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे. मुंबई शहर जिल्ह्यातील दहा विधानसभा मतदारसंघात दि. 20 नोव्हेंबर 2024 रोजी मतदान होणार आहे. या अनुषंगाने निवडणूक निकालांचे अंदाज 13 नोव्हेंबर 2024 रोजी सकाळी सात वाजेपासून ते 20 नोव्हेंबर 2024 रोजी सायंकाळी 6.30 वाजेपर्यंतच्या कालावधीत कोणत्याही प्रकारच्या एक्झिट पोलचे आयोजन करणे, कोणत्याही माध्यमांद्वारे प्रकाशन अथवा प्रसारण करण्यास प्रतिबंध लागू राहणार आहे.

त्याचप्रमाणे मतदान संपण्याच्या आधी 48 तासाच्या कालावधीत निवडणूक निकालांचे अंदाज (ओपिनियन पोल) अथवा अन्य मतदान सर्वेक्षणाच्या परिणामांच्या प्रकाशन अथवा प्रसारणावर प्रतिबंध असेल, असेही निवडणूक आयोगाने अधिसूचनेद्वारे स्पष्ट केले आहे.

# नितीन कदम सोमवारी दाखल करणार आपला उमेदवारी अर्ज

## भव्य रॅलीसह संकल्प शेतकरी संघटनेचे शक्तीप्रदर्शन

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.26 ) –** बडनेरा विधानसभा मतदारसंघात प्रस्थापितांना टक्कर देण्याकरिता संकल्प शेतकरी संघटनेचे अध्यक्ष नितीन कदम सोमवारी आपला उमेदवारी अर्ज दाखल करणार आहे.

येत्या 28 ऑक्टोंबर सकाळी 12 वाजता नितीन कदम आपला उमेदवारी अर्ज दाखल करणार आहेत. या करिता संकल्प शेतकरी संघटना व नितीन कदम



वतीने बडनेरा येथील प्रचार कार्यालय येथुन डॉ.बाबसाहेब आंबेडकर व छत्रपती श्री.शिवाजी महाराज प्रेरणात्मक पुतळा बडनेरा ते साई नगर–नवाथे–राजापेठ–राजकमल चौक–दसरा मैदान– होत शाम चौकातील तहसील कार्यालय असा रॅलीचा रुट राहणार आहे. या रॅलीच्या माध्यमातून नितीन कदम आपले शक्तिप्रदर्शन करणार असल्याचे बोलले जात आहे. नितीन कदम यांनी तमाम बडनेरावासियांना या रॅलीत सहभागी होण्याचे आवाहन केले आहे.

### प्रभाकरराव नवघरे यांचे निधन



**मोर्शी–** मूळचे मोर्शी येथील रहिवासी व अर्जुन नगर अमरावती येथे स्थायिक झालेले सेवानिवृत्त ऑडिटर प्रभाकरराव मारोतराव नवघरे यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. मृत्यू समयी त्यांचे वय 88 वर्ष होते. त्यांचे पश्चात दोन मुले अविनाश व अनंत, दोन मुली, सुना, नातवंड असा मोठा आप्तपरिवार आहे. अमरावती येथे त्यांचे निवासस्थानावरून निघालेल्या अंतयात्रेला सहकार क्षेत्रातील मातब्बर मंडळी सह बराच मोठा जनसमुदाय उपस्थित होता.

# अवैध दारु विक्रेत्याला अटक

**अमरावती–** गाडगेनगर पोलिस ठाण्याच्या हद्दीतील मांडवा झोपडपट्टीत अवैधरित्या देशी दारूची विक्री करणाऱ्या आरोपीला पोलिसांनी अटक केली आहे. आरोपींकडून दारूचे दोन बॉक्स जप्त करण्यात आले आहेत. गाडगेनगर पोलिसांनी 26 ऑक्टोबर रोजी सकाळी 10 वाजता ही कारवाई केली. आगामी निवडणुका आणि दिवाळीचा सण लक्षात घेऊन पोलिस विभागाकडून जोरदार गस्त सुरू आहे. सहाय्यक पोलीस निरीक्षक मानकर व गाडगेनगर पोलीस ठाण्याचे पोलीस कर्मचारी गस्त घालत होते. यावेळी मांडवा झोपडपट्टीत अवैधरित्या दारू विक्री होत असल्याची गोपनीय माहिती मिळाली. पोलिसांनी तत्काळ धाड टाकून देशी दारूचे दोन बॉक्स जप्त केले. याप्रकरणी दारू विक्रेते सुरेश छडू निखारे (50, लमक्षी नगर, अमरावती) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# 33 केव्ही लोणी विद्युत उपकेंद्राला आय.एस.ओ.मानांकन

## आय.एस.ओ.मानांकन मिळवणारे जिल्ह्यातील पहिले विद्युत उपकेंद्र

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.26 ) –** ग्राहकांना गुणवत्तापूर्ण आणि अखंडित सेवा देण्यासाठी उपकेंद्राचे अत्यंत उत्कृष्टरित्या सक्षमीकरण आणि नूतनीकरण करण्यात आल्यामुळे जिल्ह्यातील लोणी (टाकळी) या 33 /11 केव्ही विद्युत उपकेंद्राला ङ्कस्ह 9001–2015 मानांकन मिळाले आहे.विशेष म्हणजे आय.एस.ओ.मानांकन मिळणारे हे जिल्ह्यातीलच नव्हे तर अमरावती परिमंडळातील पहिले उपकेंद्र आहे.त्यामुळे परिमंडळासाठी ही अत्यंत अभिमानास्पद बाब असल्याचे प्रतिपादन मुख्य अभियंता ज्ञानेश कुलकर्णी यांनी केले.




जिल्ह्यातील अमरावती ग्रामीण विभागा अंतर्गत लोणी (टाकळी) येथील उपकेंद्रात आयोजित विद्युत उपकेंद्रांना आयएसओ मानांकन मिळाल्याबद्दल आयोजित सत्कार समारंभात मुख्य अभियंता ज्ञानेश कुलकर्णी बोलत होते. यावेळी अधीक्षक अभियंते दिपक देवहाते, दिपाली माडेलवार, सहाय्यक महाव्यवस्थापक रूपेश देशमुख, कार्यकारी अभियंता अनिरूध्द आलेगावकर, उपविधी अधिकारी प्रशांत लहाने, उपकार्यकारी अभियंता जयंत घाटे उपस्थित होते. मुख्य अभियंता म्हणाले की, 'इज ऑफ लिव्हिंग' अर्थात ग्राहकांचे जीवनमान उंचावण्यासाठी वीज हा अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. त्यामुळे ग्राहकांना दर्जेदार वीजपुरवठा करणे ही महावितरणची जबाबदारी आहे. आय.एस.ओ. मानकानुसार उपकेंद्रात झालेल्या उत्कृष्ट कामाचा फायदा ग्राहकांना दर्जेदार सेवा देण्याकरीता होणार आहे. या उपकेंद्रासाठी कर्मचाऱ्यांनी स्वयंस्फूर्तीने केलेल्या उत्कृष्ट कामातून प्रेरणा घेत इतर विभागातील अधिकारी ,कर्मचारी यांनी आप–आपल्या क्षेत्रात पूर्ण क्षमतेने उत्कृष्ट काम करण्याचे आवाहन मुख्य अभियंता ज्ञानेश कुलकर्णी यांनी केले. यावेळी सहाय्यक अभियंता सुदाम पाकधाने,वरिष्ठ यंत्रचालक संतोष कल्हाने, यंत्रचालक योगेश मारोटकर, धनराज सदिया, हरिदास ढेकले, शिंदे, भटकर आणि आळसपुरे यांचा मुख्य अभियंता यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. याप्रसंगी कार्यकारी अभियंते अमित शिवलकर, संजय सराटे, अमित बुटे, प्रणाली विश्लेषक राजेश दाभणे, व्यवस्थापक विकास बांबल यांच्यासह अधिकारी अभियंते उपस्थित होते. कार्यक्रमाला एका सुत्रात बांधण्याचे काम सुजाता जवंजाळकर यांनी केले आणि आभार अभियंता सुदाम पाकधाने यांनी मानले.

# ढाब्यांवर विना परवाना मद्यविक्री

## पान टपऱ्याही झाले खुले बिअर बार

**महासागर प्रतिनिधी**

**वरुड ( दि.26 ) –** तालुक्यातील अनेक हॉटेल्स व ढाब्यांना मद्य विक्रीचे परवाने नाही, मात्र तरीही येथे मोठ्या प्रमाणात देशी–विदेशी मद्याची विक्री राजरोजपणे केले जात आहे. काही परवानाधारकही चढ्या दराने इतरत्र मद्य पुरवठा करित आहेत. जागोजागी थाटलेले ढाबे अवैध दारू व ग्रामीण भागातील पान टपऱ्या खुले बिअर बार झाले आहेत. हा सर्व प्रकार



कुणाच्या आशीर्वादाने चालतो, यांच्यावर कुणीच कशी कारवाई करित नाही, असा प्रश्न निर्माण झाला आहे.

वरुड तालुक्यापतील राष्टीय महामार्ग व राज्य महामार्गावर अनेक हॉटेल्स व धाबे थाटले आहेत, या ठिकाणी मिळणारे खाद्य आरोग्यासाठी योग्य आहे का असा सवाल असताना येथे अवैध दारू विक्रीही केली जात आहे. या अवैध दारू विक्रीवर राज्य उत्पादन शुल्क विभागाने जाणीपुर्वक दुर्लक्ष होत असल्याचे भासत आहे. दररोज शेकडो ग्राहकांना देशी–विदेशी मद्य व बियरची विनापरवाना विक्री केली जात आहे. शहरासह तालुक्यात अनेक हॉटेल्स असे आहेत ज्यांना मद्यविक्रीचा कुठलाच परवाना ते बिनधास्त देशी, विदेशी मद्य व बिअरची विक्री करित आहेत. हा प्रकार पोलीस विभागाला, राज्य उत्पादन शुल्क विभागाला माहित आहे, परंतू तक्रार आल्यावरही योग्य ती कारवाई होत नाही, परिणामी यंत्रणेच्या भूमिकेवर सर्वसामान्यात नाराजीचा सूर उमटत आहे.

### ग्रामीण भागात दुचाकीने मद्य पुरवठा

शहरी भागातून ग्रामीण भागात अवैधरित्या विक्री करण्यासाठी दुचाकीद्वारे दारू विक्रेत्याकडे पोहोचविली जाते. दुचाकी वर दारूचे बॉक्स ठेवून दारूची चोरटी वाहतूक होते, हा प्रकार यंत्रणेला माहिती असतानाही त्याकडे हेतू पुरस्कृत दुर्लक्ष केले जात असल्याचा आरोप होत आहे.

# मुरुमाच्या ऐवजी पिवळी मातीचा वापर

## परतवाडा ते धारणी मार्गाची निकृष्ट साईट पट्टी

**महासागर प्रतिनिधी**

**परतवाडा, ( दि.26 ) –** परतवाडा ते धारणी हा दोन राज्यमार्ग पुढे मध्यप्रदेशशी जुळला असल्याने या मार्गावर दिवसरात्री बस, ट्रक अश्या भारी वाहनांची ये–जा सुरु असते. त्यामूळे या मार्गाच्या निर्माणामध्ये गुणवत्ता खूप महत्वाची आहे. असे असताना अत्यंत महत्वाच्या असलेल्या या मार्गाच्या साईट पट्टीमध्ये मुरुमाऐवजी पिवळ्या मातीचा वापर केल्या जात असल्याने या भविष्यातील या मार्गाच्या गुणवत्तेवर प्रश्नचिन्ह उभे ठाकले आहे.



अमरावती–परतवाडा–धारणीनंतर बैतुल असा हा राज्यमार्ग येत्या काळात राष्ट्रीय महामार्ग होणार आहे. अशी घोषणा केंद्रीय भूपृष्ठ वाहतूकमंत्री नितीन गडकरी यांनी दोन वर्षांपुर्वी केली होती, परंतू अद्याप या राज्यमार्गाचे नशीब बदलताना दिसत नाही. वनविभागाच्या जटील नियमांमूळे हा मार्ग घाटवळणासह धारणीपर्यंत चिंचोळा राहणार असल्याचे चिन्ह दिसत आहे. असे असताना आहे तो मार्ग मजबूत करणे ही काळाची गरज आहे. या मार्गाची निर्मीती केली जात असताना दोन्ही बाजूच्या साईड पट्टीमध्ये योग्य मटेरिअल टाकणे गरजेचे आहे, परंतू वास्तवात मुरुमाऐवजी येथे पिवळी मातीच टाकल्या जात असल्याने या मार्गाचे भविष्य औटघटकेचे दिसत आहे.



आमच्या प्रतिनिधीला परतवाडा येथून जवळच असलेल्या अंबिका लॉन येथे सुरु असलेल्या रस्त्याच्या निर्माणकार्यस्थळी हा प्रकार दिसून पडला. या प्रकाराची चौकशी होवून गुणवत्ता तपासणी पथकाने याकडे लक्ष द्यावे अशी मागणी होत आहे.

# जि.प.स्वीप दालनाचे जिल्हाधिकाऱ्याचे हस्ते उद्घाटन

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि.26 )–** लोकशाहीचा उत्सवतंर्गत महाराष्ट्र सार्वत्रिक विधानसभा निवडणूक 2024 साठी मतदारंसाठी जनजागृती उपक्रम स्वीप अर्तगत अमरावती जिल्हा परीषदेच्या डॉ.पंजाबराव देशमुख सभागृहात बुधवार (दि.23) ला मोठ्या थाटात जनजागृती दालनाचे उद्घाटन जिल्हाधिकारी यांच्या हस्ते करण्यात आले. हे दालन सर्व नागरीकांसाठी खुले राहणार आहे.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी सौरभ कटीयार होते तर प्रमुख अतिथी पोलिस आयुक्त अमरावतीचे नविनचंद्र रेड्डी,स्वीप नोडल अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी संजीता मोहोपात्रा, पोलिस अधिक्षक ग्रामिण विशाल आनंद, मनपा आयुक्त सचिन कलंत्रे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी बाळासाहेब बायस, पो.उपायुक्त गणेश शिंदे उपस्थित होते. जनजागृती दालनाचे फित कापुन



उद्घाटन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सिईओ संजीता मोहोपात्रा यांनी तर सुत्रसंचालन ज्ञानेश्वर घाटे यांनी तर आभार संजय राठी यांनी मानले.